FYBMM(CM) N03AGW Eff. Com. skills -II 9/3/15 (L)

वेळ – २ तास ३० मि.
गुण – ७५

सूचना – सर्व प्रश्न अनिवार्य आहेत

---

प्र. १) पुढे दिलेल्या बातमीचे (भाषिक, व्याकरणात्मक तसेच वाक्यरचनेसंबधीचे) संपादन करुन बातमीचे पुर्नलेखन करा. (१५)

मोदी सराकार आपल्याला यापुढे या पदावर ठेवू इच्छित नाही, असा थेट आरोप करून नोबेल पारितोषिक विजेते अर्थ शास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी नालंदा विद्यापीठा च्या कुलपतिपदाच्या उमेदवारी तून दुसऱ्या कार्यकालासाठी माघार घेतली आहे. दरम्यान, सरकारने मात्र अमर्त्य सेन यांच्या आरोपाचा इन्कार केला आहे.

सेन यांच्या आरोपावर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते सय्यद अकबरउद्दीन यांनि सांगितले की, सेन याचा कार्यकाल कमी करण्याचा किंवा त्यांना पुन्हा कुलपतीपद न देण्याचा कुठलाहिविचार सरकारने केलेला नाही. नालंदा विद्यापीठाच्या बैठकीचा वृत्तांत अजून परराष्ट्र मंत्रालयाकडे आलेला नाही त्यामुळे सध्यातरी आम्ही काही करु शकत नाही.

सेना यांनी सांगितले की, या बैठकिचा वृत्तांत १५ दिवसांपूर्वीच पाठवण्यात आला असून परीराष्ट्र मंत्रालय वगळता सगळ्यांनाच वृत्तांत पाटवण्यात आल्याची माहिती आहे. शिक्षण क्षेत्रात राजकारणाचा शिरकाव हा यातील मुद्दा आहे. सरकारने अनेक विद्यापीठांच्या कामात हस्तक्षेप केला आहे. याची उदाहारणेही आहेत. पंतप्रधान मोदी यांचे टाकीकार असलेले सेन यांनी नालंदा विद्यापीठाच्या प्रशासकीय मंडळाला पत्र पाठवले असून त्यात विद्यापीठाच्या कुलपतीपदाच्या उमेदवारितुन मागार घेत असल्याचे म्हणले आहे.

प्र. २ अ) तुमच्या महाविद्यालयात नुकत्याच साजऱ्या करण्यात आलेल्या 'मराठी राजभाषा दिन' कार्यक्रमाचे वृत्तलेखन करा. (०८)

प्र. २ ब) १० वी व १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षा सुरु असताना तुम्ही राहत असलेल्या परिसरात होणाऱ्या वारंवार खंडीत होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तक्रार करणारे पत्र वीजमंडळ अधिकाऱ्यास लिहा. (०७)

किंवा


प्र. २ अ) तुमच्या महाविद्यालयातील गंधर्व महोत्सवावर बातमी लेखन करा. (०८)

प्र. २ ब) ठाणे येथील महालक्ष्मी शोरुम मधून तुम्ही वॉशिंग मशिन विकत घेतले आहे. (०७) एका महिन्याच्यां कालावधीतच ते नादुरुस्त झाले व त्याबाबत विक्रेत्याला तक्रार दिली असता त्याने दखल घेतली नाही. या संदर्भातील तक्रार ठाणे येथील ग्राहक तक्रार निवारण मंच येथे देण्यासाठी पत्रलेखन करा.

(P.T.O.)

N03AGW

प्र. ३ अ) पुढे दिलेल्या नकाशाचे सविस्तर स्पष्टीकरण द्या. (०८)





Index Values = निर्देशांक मूल्य

प्र. ३ ब) बातमी लेखनातील मुख्य मथळा, उपमथळा, व मसुधाचे महत्व स्पष्ट करा. (०७)

किंवा

प्र. ३ अ) पुढे दिलेल्या नकाशाचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (०८)




प्रश्न अ) जलविद्युत निर्मिती जास्त असलेल्या राज्यांची नावे लिहा. ? २

ब) वाफेच्या उर्जेचे ७ ५ टक्यांपेक्षा जास्त प्रमाण असलेल्या राजांची नावे लिहा. २

क) वरील नकाशात कोणते नकाशिय तंत्र वापरले आहे १

ड) वरील नकाशावर थोडक्यात भाष्य करा. ३

(P.T.O.)

N03AGW

प्र. ३ ब. हार्ड न्यूज व सॉफ्ट न्यूज म्हणजे काय ? उदाहरणासहित स्पष्ट करा. ७

प्र.४) प्रस्तुत गद्यांश का सार अपनी भाषा मे लिखिये । १५

फल की भावना से उत्पन्न आनन्द भी साधक को कर्मो की और हर्ष और तत्परता के साथ प्रवृत्त करता है । पर फल का लोभ जहाँ प्रधान रहता है वहाँ कर्म विषयक आनन्द उसी फल की भावना की तीव्रता और मन्दता पर अवलम्बित रहता है । उद्योग के प्रभाव के बीच जब फल की भावना मन्द पडती है, उसकी आशा कुछ धुँधली पड जाती है, तब आनन्द की उमंग गिर जाती है और उसी के साथ उद्योग में भी शिथिलीत्ता आ जाती है। पर कर्म – भावना – प्रधान उत्साही बराबर एक – रस रहता है । फलासक्त उत्साही असफल होने पर खिन्न और दु:खी होता है, पर कर्मासक्त उत्साही केवल कर्नुष्ठान के पूर्व की अवस्था में हो जाता है । अंत: हम कह सकते है कि कर्म – भावना – प्रधान उत्साह ही सच्चा उत्साह है । फल – भावना – प्रधान उत्साह तो लोभ ही का एक प्रच्छन्न रुप है ।

प्र. ५ ) पुढील उताऱ्याचा हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करा. १५

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या भारत भेटीच्या वेळी परिधान केलेला वादग्रस्त बंद गळा सुट अहमदाबाद येथे शुक्रवारी सायंकाळी अखेर ४.३१ कोटी रुपयांना लिलावात विकला गेला आहे. हा टू पीस सुट असून तो विकत घेण्यासाठी चढाओढ लागली होती. नेव्ही ब्लू रंगाचा हा सुट असून तो सुरतचे हिरे व्यापारी लालजी पटेल व त्यांच्या मुलाने सर्वाधिक बोली लावून विकत घेतला आहे. या सुटची मूळ किंमत १० लाख होती व त्याला आता एवढी मोठी किंमत आली आहे.

धर्मानंद हिरे कंपनीचे मालक लालजी पटेल व त्यांचे पुत्र हितेश पटेल यांनी ४.३१ कोटी रुपयांना हा सूट खरेदी केला असे अहमदाबादचे जिल्हाधिकारी राजेंद्र कुमार यांनी सांगितले, लिलावाची प्रक्रिया तीन दिवस चालू होती, ती शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता सपंली. शेवटच्या तासात लिलावाच्या ठिकाणी बराच गोंधळही झाला व बोली वाढत गेली. खरेतर या सुटाची नेमकी किंमत कुणालाही माहीत नाही. तरी तो १० लाखांचा असल्याचे मानले जाते. या सूटवर 'नरेंद्र दामोदरदास मोदी' असे नाव सोनेरी विणकाम करुन कोरलेले आहे. बुधवारी ११ लाखांपासून त्याची बोली सूरु झाली होती.अखेर पंतप्रधान नरेंद्र मोंदींच्या या सूट प्रकरणावर या लिलावानंतर कायमचा पडदा पडला आहे.

---

FYBMM (M) 7/3/15 Intro to Litt (L)

N03AFT

वेळ : २.३० तास | गुण : ७५

**सूचना - १. सर्व प्रश्न आवश्यक.**

**२. उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.**

**प्रश्न १ ला :** चेखॉव्हच्या लघुकथेचे वैशिष्ट्य सांगून 'राणी सरकार' या कथेचे विश्लेषण करा. (१५)

**प्रश्न २ रा :** **अ.** 'अर्नेस्ट हेमिंग्वे' यांच्या एका कोळियाने या कादंबरीत त्यांच्या जीवनानुभवातील रांगडेपणा दिसून येतो, या विधानाची चर्चा करा. (१५)

**किंवा**

**ब** 'बॅचलर ऑफ आर्टस्' ह्या आर.के. नारायण यांच्या कादंबरीतून जीवनाकडे बघण्याचा एक विशिष्ट प्रकारचा दृष्टिकोन दिसून येतो या विधानाचा परामर्श घ्या. (१५)

**प्रश्न ३ रा :** **अ.** 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकातील मुख्य पात्रांच्या आधारे जीवनातील सुष्ट दुष्ट प्रवृत्तींचा संघर्ष सांगा. (१५)

**किंवा**

**ब.** श्रेष्ठ नाटककार शेक्सपिअर यांच्या नाटकाची वैशिष्ट्ये सांगा.

**प्रश्न ४ था :** **अ.** 'सुनीत' या शेक्सपिअरच्या काव्य प्रकाराने इंग्रजी काव्यविश्वात कशी भर घातली हे स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

**ब.** 'वर्डस्वर्थच्या कवितांतून सौंदर्यवादाचा प्रत्यय येतो' हे विधान स्पष्ट करा. (१५)

**प्रश्न ५ वा :** **टीपा लिहा. (कोणत्याही तीन)** (१५)

१. कवितेची भाषा.

२. कथा आणि कादंबरीतील वेगळेपण.

३. कादंबरीतील निवेदनाचे प्रकार.

४. कथेचे घटक.

५. नाटकातील संवाद.

FY BMM(m) Intro to Psychology. 4/3/15

(L)

N03AGQ

वेळ : 2.30 तास

गुण : ७५

सर्व प्रश्न आवश्यक

प्रश्न क्र. १ अनिवार्य

प्र. १ मानसशास्त्राची व्याप्ति स्पष्ट करा. [१५]

प्र. २ अ] दीर्घकालीन स्मृतीचे प्रकार लिहा. [८]

ब] विस्मृतीची कारणे लिहा. [७]

किंवा

अ] विचार साधने स्पष्ट करा. [८]

ब] विचारांची वैशिष्ट्ये लिहा. [७]

प्र. ३ अ] मॅस्लॉव्हचा गरज अधिश्रेणी सिद्धान्त लिहा. [८]

ब] संघर्षाचे प्रकार स्पष्ट करा. [७]

किंवा

अ] व्यक्ति इतिहास पद्धति स्पष्ट करा. [८]

ब] सर्वेक्षण पद्धति स्पष्ट करा. [७]

प्र. ४ अ] अभिजात अधिसंधान प्रयोगासहित स्पष्ट करा. [१५]

किंवा

ब] संरक्षण यंत्रणा स्पष्ट करा. [१५]

प्र. ५ टीपा लिहा (कोणत्याही तीन) [१५]

१ भावना

२ इदं अहं पराहम

३ मानसिक आरोग्य

४ ताण

५ प्रेरणांचे प्रकार

FYBMM (M) 02/03/15
POL. CONCEPTS. N03AGP (L)

वेळ – २ तास ३० मि. गुण – ७५

सूचना : १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

---

प्र.१) लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करा. लोकशाही शासन पध्दतीचे फायदे व तोटे उदाहरणासहित चर्चा करा. (१५)

प्र.२) भारतातील राजकीय पक्षांचे स्वरुप व प्रकार उदाहरणासहित स्पष्ट करा. (१५)

किंवा

प्र.२अ) भारतीय नागरीकांच्या मुलभूत अधिकारांची चर्चा करा. (८)

प्र.२ ब)भारतातील निवडणूक आयोगाची रचना व कार्य लिहा. (७)

प्र.३) भारतातील २०१४ च्या लोकसभा निवडणूकांमधील प्रचार, मतदान व निकाल यावर विस्ताराने चर्चा करा. (१५)

किंवा

प्र.३) लोकशाही व्यतिरिक्त असलेल्या विविध शासन पध्दती स्पष्ट करा. (१५)

प्र.४) भारतातील दलित चळवळीची सुरुवात व आतापर्यंतची वाटचाल यावर विविध उदाहरणांद्वारे चर्चा करा. (१५)

किंवा

प्र.४अ) 'स्थानिक स्वराज्य संस्था' यावर टिप लिहा. (०८)

प्र.४ब) भारतातील निवडणूक सुधारणांवर चर्चा करा. (०७)

**प्र.५. कोणत्याही तीन टिपा लिहा.** (१५)

अ) आम आदमी पक्ष

ब) मतदान पूर्व व मतदानोत्तर कल चाचणी

क) स्वातंत्र्याचा हक्क

ड) सार्वभौमत्व

इ) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

ई) आघाड्यांचे सरकार

--

FYBMM(M) 3/3/15 Prinp of Mgmt.

(L)

N03AFN

वेळ : २.३० तास गुण : ७५

सूचना - १. सर्व प्रश्न आवश्यक.

२. उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

**प्रश्न १ ला : पुढील केसस्टडी वाचून त्यावरील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**केसस्टडी- ग्राहक संतोष** - एका नामांकित खान-पान सेवेचे तुम्ही गटनेता आहात. तुमच्या हाताखालील गटात अनेक उपव्यवस्थापक आहेत, मुंबई विद्यापीठातील अनेक महाविद्यालयातील कॅन्टीनमध्ये तुम्ही खान-पान सेवा पुरविता. नुकतीच एक पाहणी करण्यात आली. त्यात विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी सर्वांनी महाविध्यालयात त्या विशिष्ट समुहातर्फे देण्यात येणाऱ्या खान-पान सेवेविषयी विचारण्यात आले. त्यावेळी पाहणीतून मिळालेला प्रतिसाद निराशजनक होता. अन्नपदार्थ बेचव असणे, पदार्थ ठरलेल्या वजनापेक्षा कमी देणे, कॅन्टीनमध्ये स्वच्छता नसणे, खाद्यपदार्थांचा दर्जा खालावलेला असणे, जंकफूडचा साठा असणे, पदार्थांची कमतरता असणे, कॅन्टीन कर्मचाऱ्यांनी योग्य सेवा न देणे इत्यादी. अशा विविध तक्रारी समोर आल्या. यावर तुम्ही निर्णय घ्यायचा आहे. करार केलेल्या व्यवस्थापकास योग्य ती समज देणे किंवा त्याचा करार रद्द करून अन्य कुणास संधी देणे. कारण अंतिमतः ग्राहक संतोष महत्त्वाचा. ही परिस्थिती तुम्ही कशी हाताळाल?

प्रश्न -

१. या केस स्टडीमध्ये सर्वात महत्त्वाचे कोण आहे? का? (५)

२. यात कोणकोणत्या तक्रारी आहेत? (५)

३. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तुमच्या मते योग्य उपाय कोणता? का? (५)

प्रश्न २ रा : अ. व्यवस्थापनाची सामाजिक जबाबदारी यावर टीप लिहा. (८)

ब. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय? (७)

किंवा

अ. व्यवस्थापनाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये लिहा (८)

ब. व्यवस्थापकाची कोणतीही पाच कौशल्ये लिहा. (७)

FYBMM(M) 3/4/16 Principal Mgm

N03AFN

प्रश्न ३ रा : अ. निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या सांगा. (८)

ब. कर्मचारी नियुक्तीची गरज कशासाठी असते.. (७)

किंवा

अ. नेतृत्वाची संकल्पना सांगून त्याचे महत्त्व सांगा. (८)

ब. संघटन म्हणजे काय? संघटनेची प्रक्रिया लिहा. (७)

प्रश्न ४ था : अ. व्यवस्थापन म्हणजे काय ते सविस्तर सांगून व्यवस्थापकाची भूमिका स्पष्ट करा (१५)

किंवा

ब. व्यवस्थापनाच्या व्याख्या सांगून पीटर ड्रकरची व्यवस्थापनाची संकल्पना सविस्तर लिहा. (१५)

प्रश्न ५ वा : टीपा लिहा. (कोणत्याही तीन) (१५)

१. हेन्री फेयॉल.

२. व्यवस्थापनाच्या पातळया.

३. बदलांचे व्यवस्थापन.

४. फेड्रिक टेलर.

५. तणावाचे व्यवस्थापन.

FY BMM (M) Principles of Mktg 5/3/15 (L)

N03ABQ

वेळ : अडीच तास] [गुण : ७५

सूचना १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

प्रश्न क्रमांक १) श्रीमती दीक्षित ह्या सौन्दर्यशास्त्राच्या शास्त्रज्ञ आहेत . त्यांनी मुरुम/ पुटकूळी नाहीसे करण्यासाठी एक मलमाचा शोध लावला आहे. हे एक विशेष उत्पादन आहे. जर हे मलम गुणकारी ठरले तर त्यास खूप मोठी बाजारपेठ प्राप्त होईल. त्या तुमच्या कडे खालील प्रश्नाविषयी सल्ला मागायला आल्या आहे. आपण काय सल्ला द्याल ते लिहा.

1) या मलमासाठी कोणत्या वितरण मार्गाची निवड करावी हे कारण सहित सांगा. (५ गुण)

2) विक्री वाढविण्यासाठी कसे प्रयत्न करावे ते सांगा. (५ गुण)

3) आपण लक्ष्य ग्राहकांपर्यंत कसे पोहोचणार ? (५ गुण)

प्रश्न क्रमांक २. अ) बाजारपेठ विभाजनाचे प्रकार स्पष्ट करा. (७ गुण)

ब) मूल्यनिर्धारण उद्दिष्टे थोडक्यात लिहा. (८ गुण)

किंवा

प्रश्न क्रमांक २. अ) विपणनाची व्याप्ती स्पष्ट करा. (७ गुण)

ब) सरकारच्या दृष्टीकोनातून विपणनाचे महत्व थोडक्यात लिहा. (८ गुण)

प्रश्न क्रमांक ३. अ) विपणनाचे बाह्य पर्यावरण थोडक्यात स्पष्ट करा. (७ गुण)

ब) 4'Pही संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा. (८ गुण))

किंवा

प्रश्न क्रमांक ३. अ) वस्तु टिकावाचे डावपेच स्पष्ट करा. (७ गुण)

ब) सेवेचा याचा अर्थ काय ? सेवा विपणनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (८ गुण)

प्रश्न क्रमांक ४. अ) विपणन माहिती प्रणाली स्पष्ट करा. (७ गुण)

ब) भारतातील ग्रामीण भागातील विपणनाच्या समस्या स्पष्ट. (८ गुण)

किंवा

प्रश्न क्रमांक ४. अ) उत्पादन स्थिती धोरण स्पष्ट करा. (७ गुण)

ब) आधुनिक विपणन प्रकार थोडक्यात स्पष्ट करा. (८ गुण)

प्रश्न क्रमांक ५. थोडक्यात लिहा (१५ गुण)

अ. पॅकिंग निर्णय ब. किंमत निर्णय क. मुद्रांकन

***************************